महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे **जीवनदीप वार्ता**

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

Rs.2/-

मंगळवार ◆०५ ऑगस्ट २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०४५ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीतील रस्ते होणार चकाचक !

## आ. किसन कथोरे यांच्या हस्ते रस्त्यांच्या कॉंक्रीटीकरणाच्या कामाला सुरवात





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीतील रस्त्याच्या कामासाठी पहिल्या टप्प्यात शासनाकडून साडेसात कोटी रुपये मंजूर करण्यात आले असून कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारातील रस्त्यांच्या कॉंक्रीटीकरणाच्या कामाचे भुमिपुजन आमदार किसन कथोरे यांच्याहस्ते सिडकोचे माजी अध्यक्ष प्रमोद हिंदुराव तसेच शिवसेनेचे जिल्हा प्रमुख अरविंद मोरे, सभापती रविंद्र घोडविंदे व संचालक मंडळाच्या उपस्थित मध्ये करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाला सभापती रवींद्र घोडविंदे, उपसभापती जालिंदर पाटील, ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष अरुण पाटील, संचालक राजेश पाटील, बाजार समितीचे संचालक भरत गोंधळे, कपिल थळे, वसंत लोणे, रविंद्र भोईर, शंकर आव्हाड, विद्या पाटील, रविंद्र आव्हाड, किशोर वाडेकर, योगेश धुमाळ, शारदा पाटील, नरेश सुरोशी, विजय सुरोशी, अरुण पाटील, मनोहर पाटील, काशिनाथ नरवडे, गिरीश पाटील, व्यापारी प्रतिनिधी गणेश पोखरकर, वसंत डेडिया यांच्यासह शेतकरी, व्यापारी व विविध पक्षांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> **बाजार समितीमध्ये दररोज हजारो शेतकरी व व्यापाऱ्यांची ये जा होते. मात्र रस्त्यांची अपुरी व्यवस्था आणि खराब पायाभूत सुविधा यामुळे त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता.निवडणुकीच्या प्रचारादरम्यान मी मतदारांना वचन दिले होते की, निवडणूक संपल्यानंतर सर्वप्रथम भाजी मार्केट व फुल मार्केटमधील रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करण्यात येईल. आज या शब्दपूर्तीस प्रारंभ करताना मला विशेष समाधान वाटते.**
>
> **- आ. किसन कथोरे**



आमदार किसन कथोरे यांनी सांगितले की बाजार समिती निवडणुकीच्या प्रचाराला आलो तेव्हा पाहिलं याठिकाणी आधी काही करायचं असेल तर रस्ता करायला पाहिजे. पहिल्या टप्प्यात रस्त्याचं कॉंक्रीटीकरण करणे आवश्यक आहे. दुसऱ्या टप्प्यात कचऱ्यापासून सेंद्रिय खत तयार करण्याचा प्रकल्प करू. तिसऱ्या टप्प्यात सौरउर्जेवर बाजार समितीला वीजपुरवठा करणार. याबाबत महावितरणच्या अधिकाऱ्यांशी बोलणं झालं असून यासाठी ते अनुदान देखील द्यायला तयार आहेत.

जनावरांच्या बाजाराची परिस्थिती वाईट असून चौथ्या टप्प्यात सुधारणा करून येथील शेणखताला बाजारपेठ उपलब्ध करून देऊन शेतकऱ्यांना शेणखत उपलब्ध करून देणार. शेतकऱ्यांसाठी कृषी भवन उभारणार. मार्केटच्या सम्पूर्ण जागेचा आराखडा तयार करून चांगल्या सुविधा देणार. रायत्याला बाजार समितीसाठी जागेची मागणी केली आहे. याठिकाणी बडोदा हायवे आणि समृद्धी महामार्गाची कनेक्टीव्हिटी आहे. मुरबाड मध्ये काही गावांमध्ये सेंद्रिय पिकं घेण्याचा कल तयार करत आहोत. चांगल्या सुविधा देणार तेव्हा उत्पन्न देखील वाढेल. फुल मार्केटचा विषय मार्गी लावला जाईल. एसी मार्केटची सुरवात फुल मार्केटपासून करू त्याआधी येथील सर्वच रस्ते सुधारण्यावर आपला भर असेल. बाजार समितीचे उत्पन्न वाढण्यासाठी कर्मचाऱ्यांनी देखील प्रयत्न केले पाहिजे त्याची जवाबदारी सचिवांची असेल असे यावेळी आमदार किसन कथोरे यांनी सांगितले.

---

### कल्याण डोंबिवली पालिका हद्दीत

# तीस नव्या कर भरणा केंद्रांची भर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण - मागील आठवड्यात मालमत्ता कर विभागाच्या उपायुक्त कांचन गायकवाड यांनी दहा प्रभाग हद्दीत १८ मालमत्ता कर आणि पाणी देयक विशेष भरणा केंद्रे सुरू केली आहेत. आपल्या घर परिसरात सुरू झालेल्या या केंद्रांना नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे मालमत्ता विभागाने दहा प्रभाग हद्दीत वाढीव विविध भागात एकूण ३० नवीन विशेष कर भरणा केंद्रे सुरू केली आहेत. त्यामुळे भरणा केंद्रांची एकूण संख्या ४८ झाली आहे. नागरिकांनी मालमत्ता कर आणि पाणी देयक शुल्क लवकरात लवकर भरणा करावे आणि मार्च अखेरपूर्वीच पालिकेचा मालमत्ता कर आणि पाणी देयक वसुलीचा लक्ष्यांक पूर्ण व्हावा या दृष्टीने प्रशासनाने प्रयत्न सुरू केले आहेत. यापूर्वी मालमत्ता विभागात अतिशय संथगतीने आणि नकारात्मक पध्दतीने काम सुरू होते. नागरिक, कर विभागातील कर्मचाऱ्यांमध्ये याविषयी नाराजी होती.



मालमत्ता विभागाचा पदभार कांचन गायकवाड यांनी स्वीकारल्यापासून या विभागातील बहुतांशी प्रलंबित प्रकरणे मार्गी लावणे, मालमत्ता कर वसुलीसाठी प्रत्यक्ष घटनास्थळी जाणे, नव्याने सुरू झालेल्या विशेष भरणा केंद्रांना भेटी देऊन नागरिकांचा मिळणारा प्रतिसाद पाहून त्याप्रमाणे निर्णय घेणे. त्यामुळे कर विभागासह प्रभाग स्तरावरील कर विभागातील कर्मचारी आता कामाला लागले आहेत.

गेल्या आठवड्यात सुरू करण्यात आलेल्या विशेष भरणा केंद्रांना नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे पाहून उपायुक्त गायकवाड यांनी दहा प्रभाग हद्दीत अधिक वस्तीची गृहसंकुले, नागरिकांच्या सोयीचा विचार करून त्या भागात ३० विशेष भरणा केंद्रे सुरू केली आहेत. व्यापारी, नोकरदार, व्यावसायिक यांची सर्वाधिक सोय झाली आहे. सकाळी दहा ते संध्याकाळी पाच वेळेत ही केंद्रे सुरू राहणार आहेत.

नव्याने सुरू झालेली कर भरणा केंद्रे अ प्रभाग नेपच्युन स्वराज सेक्टर १, आंबिवली पश्चिम, थारवाणी इमारत वेदांत मिलेनया, टिटवाळा पूर्व, शंकेश्वर क्रिस्टर रस्ता, म्हस्कळ रस्ता, टिटवाळा पूर्व. ब प्रभाग - रोझाली संकुल, झुलेलाल चौक, बारावे, कल्याण, मिलिंदनगर, गौरीपाडा, चिकणघर, गुरू आत्मन सोसायटी, गौरीपाडा, क प्रभाग व्हर्टेक्स सोसायटी, खडकपाडा, जे प्रभाग - कशीश गॅलेक्सी, ९० फुटी रस्ता, कचोरे, मोहन सृष्टी, नेतिवली, ड प्रभाग - कृष्णा पॅरेडाईज, तिसगाव, जरीमरी मंदिर रस्ता, तिसगाव, बिपिन मिश्रा, सह्याद्री पार्कजवळ, काटेमानिवली, फ प्रभाग शितला मंदिर गोग्रासवाडी, सर्वोदय लिला, खंबाळपाडा, शेलार ऑफिस, शेलार नाका, ह प्रभाग सुकऱ्या शिवा चौक, कोपरगाव, निता वैती ऑफिस, गणेशनगर, शिवसेना पदाधिकारी संदेश पाटील यांच्या कार्यालयाच्या जवळ, सत्यवान चौक, देवीचापाडा, अग्निशमन केंद्र, चिंचोड्याचा पाडा, ग प्रभाग युगंधर सुदामा सोसायटी, मानपाडा रस्ता, कस्तुरी प्लाझा, मानपाडा रस्ता, बालाजी गार्डन, आयरे, कोपर पूर्व, धोत्रे मैदान, दत्तनगर, आय प्रभाग- गिता भवन सोसायटी, आडिवली, द्वारका हास्कूल, नमस्कार ढाब्याजवळ, मधुकर गॅलेक्सी, दावडी, ई प्रभाग कासाबेला गोल्ड क्लब हाऊस, मानपाडा जुनी ग्रामपंचायत, नांदिवली जुनी ग्रामपंचायत.

---

### जीवनदीप महाविद्यालयात

# मुंबई विद्यापीठाचा ५८ वा युवक महोत्सव संपन्न




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

गोवेली : विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन जीवनात त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांचा विकास व्हावा, त्यांच्या व्यक्तिमत्त्वात बदल घडवून यावा; याकरिता विद्यार्थी विकास विभाग मुंबई विद्यापीठ व जीवनदीप महाविद्यालय गोवेली यांच्या समन्वयाने ठाणे पालघर ग्रामीण झोन क्रमांक सहाचा ५८ वा युवक महोत्सव २०२५ जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथे अतिशय उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाची सुरुवात प्रथमतः गणरायाच्या पूजनाने व दीप प्रज्वलन करून करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक वाघ व उपस्थित मान्यवरांनी गणरायाचे पूजन केले व कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. राष्ट्रगीत, राज्यगीत व विद्यापीठ गीत सादर करून संपूर्ण सभागृह मंत्रमुग्ध करण्यात आला. दिनांक ०४-०८-२०२५रोजी च्या या युवक महोत्सवात प्रमुख मान्यवर कलाकार संदीप रेडकर, श्री. निलेश सावे, कलाकार शितल रेडकर, ठाणे पालघर झोनचे समन्वयक डॉ.जयश्री कवठेकर, डॉ. प्रकाश धुमाळ, हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक वाघ यांनी केले, प्रमुख मान्यवर संदीप रेडकर व निलेश सावे यांनी विद्यार्थ्यांना युवक महोत्सवाबाबत मार्गदर्शन केले. या नंतर सर्व कार्यक्रमांना सुरुवात करण्यात आली.

या कार्यक्रमांमध्ये रांगोळी, वकृत्व, एकपात्री, पथनाट्य, मेहंदी, पारंपारिक नृत्य, संगीत, वादविवाद स्पर्धा, ऑन स्पॉट पेंटिंग, क्ले आर्ट इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सर्व कार्यक्रम पार पडल्यानंतर विद्यार्थी व महाविद्यालयाचे समन्वय प्राध्यापक यांनी आपले मनोगत व्यक्त करता वेळी जीवनदीपच्या उत्तम आदरातिथ्य बाबत आभार व्यक्त केले. युवक महोत्सवात सहभागी व विजयी महाविद्यालयांना संस्थेचे अध्यक्ष रवींद्र घोडविंदे यांनी प्रमाणपत्र व गुलाब पुष्प देऊन सन्मानित केले. व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करता वेळी तुम्ही युवक आहात तरुण आहात या तारुण्याचा उपयोग देशाच्या, समाजाच्या व स्वतःच्या उन्नतीसाठी करा असे आवाहन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सतीश लकडे यांनी केले. महोत्सवासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक वाघ, उपप्राचार्य. हरेंद्र सोष्टे, संचालक. प्रशांत घोडविंदे तसेच सांस्कृतिक विभाग प्रमुख. प्रा.सतीश लकडे, प्रा. मोहन गारे, प्रा. मयुरी कांबळे , प्रा. ललिता पवार, महाविद्यालयातील सर्वच प्राध्यापक वर्ग शिक्षकेतर कर्मचारी NSS चे स्वयंसेवक विद्यार्थी, यांच्या सर्वांच्या सहकार्याने सदर युवक महोत्सव यशस्वी रित्या संपन्न झाला.











# गीतासार

### अध्याय १८
### मोक्षसंन्यासयोगः

यत्तु कृत्स्नवदेकस्मिन्कार्ये सक्तमहैतुकम् । अतत्त्वार्थवदल्पं च तत्तामसमुदाहृतम् ॥१८-२२॥

परंतु जे ज्ञान एका कार्यरूपी शरीरातच पूर्णासारखे आसक्त असते, तसेच जे युक्तिशून्य, तात्त्विक अर्थाने रहित आणि तुच्छ असते, ते तामस म्हटले गेले आहे. ॥ १८-२२ ॥

नियतं सङ्गरहितमरागद्वेषतः कृतम् । अफलप्रेप्सुना कर्म यत्तत्सात्त्विकमुच्यते ॥ १८-२३ ॥

जे कर्म शास्त्रविधीने नेमून दिलेले असून कर्तेपणाचा अभिमान न बाळगता फळाची इच्छा न करणाऱ्या माणसाने राग व द्वेष सोडून केलेले असते, ते सात्त्विक म्हटले जाते. ॥ १८-२३ ॥

यत्तु कामेप्सुना कर्म साहङ्कारेण वा पुनः । क्रियते बहुलायासं तद्राजसमुदाहृतम् ॥१८-२४॥

परंतु जे कर्म अतिशय परिश्रमपूर्वक तसेच भोगांची इच्छा करणाऱ्या किंवा अहंकार बाळगणाऱ्या माणसाकडून केले जाते, ते राजस म्हटले गेले आहे. ॥ १८-२४ ॥

अनुबन्धं क्षयं हिंसामनवेक्ष्य च पौरुषम् । मोहादारभ्यते कर्म यत्तत्तामसमुच्यते ॥ १८-२५ ॥

जे कर्म परिणाम, हानी, हिंसा आणि सामर्थ्य यांचा विचार न करता केवळ अज्ञानाने केले जाते, ते तामस होते. ॥ १८-२५ ॥

## रेसिपी
# फराळी पॅटीस



**साहित्य-**

११/४ कप- कोणतेही फराळी पीठ
चार- उकडलेले बटाटे
१/३ कप- भाजलेले शेंगदाणे
एक चमचा- जिरे
चवीनुसार मीठ
तीन- हिरव्या मिरच्या
आले किस
कोथिंबीर
एक चमचा- लिंबाचा रस

**कृती-**

सर्वात आधी एका मोठ्या भांड्यात फराळी पीठ काढा. त्यात चवीनुसार जिरे आणि मीठ घाला. दुसरीकडे, उकडलेल्या आणि मॅश केलेल्या बटाट्यांमध्ये बारीक चिरलेल्या हिरव्या मिरच्या तुकडे, कोथींबीर आणि किसलेले आले घाला आणि सर्वकाही चांगले मिसळा. आता भाजलेले शेंगदाणे बारीक वाटून घ्या आणि मिश्रणात घाला. शेंगदाण्याचे तुकडे खूप चवदार लागतात. तसेच लिंबाचा रस देखील घाला. आता मिश्रणातून गोल पॅटीज बनवा. तसेच फराळी पीठात थोडे पाणी घालून जाड बॅटर तयार करा. आता एका पॅनमध्ये तूप किंवा शेंगदाणा तेल गरम करा. पॅटीज बॅटरमध्ये बुडवा आणि नंतर त्या पॅनमध्ये ठेवा. पॅटीज मध्यम आचेवर दोन्ही बाजूंनी सोनेरी होईपर्यंत तळा आणि नंतर जास्त तेल काढण्यासाठी किचन नॅपकिनवर ठेवा. तर चला तयार आहे आपले फराळी पॅटिस रेसिपी, उपवासाच्या चटणीसोबत नक्कीच सर्व्ह करा.

## बालक मंदिर संस्था
# इंग्लिश मिडियम शाळेमध्ये आर्ट मेळावा संपन्न



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : बालक मंदिर संस्था, कल्याण इंग्लिश मिडियम माध्यमिक शाळेतर्फे १ ऑगस्ट लोकमान्य बाळ गंगाधर टिळक पुण्यतिथी निमित्त दि.४ ऑगस्ट २०२५ रोजी विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा म्हणून शाळेतर्फे 'आर्ट मेळाव्या'चे आयोजन करण्यात आले. या आर्ट मेळाव्यामध्ये शाळेतील पूर्व प्राथमिक ते इ. १० वी पर्यंतच्या ६०० हून अधिक विद्यार्थ्यांनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदविला. या आर्ट मेळाव्यामध्ये विद्यार्थ्यांना विषयाचे बंधन नव्हते, विद्यार्थ्यांनी मुक्तपणे आपल्या आवडीप्रमाणे चित्रनिर्मिती करून कलेचा आनंद लुटला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून कॅप्टन रवींद्र माधव हायस्कूलचे सेवानिवृत्त कलाध्यापक कैलास यादव सरोदे उपस्थित होते, त्यांच्या हस्ते आर्ट मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले ,यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका कांचन इंगोले , इंग्लिश मिडियम पूर्व प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका मारिया , प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सुवर्णा ठाकरे व शाळेचे व्यवस्थापक अशोक जाधव उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सरोदे यांनी विद्यार्थ्यांना कलेचे महत्त्व समजावून सांगितले. कोणत्याही कलेची आपण छंद म्हणून जोपासना केली, तर पुढे तीच कला आपल्या पोटाच्या उदरनिर्वाहाचे साधन होऊ शकते ,असे त्यांनी आवर्जून सांगितले. सदर आर्ट मेळावा यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या आगळयावेगळया आर्ट मेळाव्याचे संस्था पदाधिकारी व पालकांकडून विशेष कौतुक करण्यात आले.

## पेण एज्युकेशन सेवक सहकारी पतसंस्थेच्या सभेत
# गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांचा सत्कार



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : पेण एज्युकेशन सोसायटी सेवक सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे अध्यक्ष धनाजी रामभाऊ घरत यांच्या अध्यक्षतेखाली आज संपन्न झाली. सभासदांना कायम निधीवर 6% तर लाभांश वाटप 9% असा डिव्हीडंट जाहीर केल्याने सभासदांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

या वार्षिक सर्वसाधारण सभेला पतसंस्थेचे अध्यक्ष धनाजी घरत, उपाध्यक्ष गौरव च-हाटे, सचिव सुनील खेडकर, संचालिका सौ अर्चना नेमाडे, सौ सुजाता जाधव, संचालक संतोष जाधव, सतीशकुमार पवार, अरुण कांबळे तज्ञ संचालक बाळासाहेब बेद्रे आदीसह मुख्याध्यापक पर्यवेक्षक माजी संचालक सदस्य पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. सरस्वती पूजन व दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

प्रास्ताविकातून सभेचे अध्यक्ष धनाजी घरत यांनी पतसंस्थेचा उंचावलेला आलेख सादर करत सभासद आणि संचालकांनी वेळोवेळी केलेले सहकार्य आणि त्याचबरोबर पतसंस्थेच्या सभासदांचे हित जोपासून सभासदांच्या कल्याणासाठी जे जे करता येईल ते संचालक मंडळ प्रामाणिकपणे विश्वासाने काम करत असल्याचे सांगितले. 31 मार्च 2025 अखेर पतसंस्थेचे 149 सभासद असून पतसंस्थेला चालू वर्षामध्ये 23 लाख रुपये नफा झाल्याने सर्व सभासदांच्या चेहऱ्यावर आनंद द्विगुणीत झालेला पहावयास मिळाला. मागील वर्षाचे अहवाल वाचन सचिव सुनील खेडकर यांनी केले.या सर्वसाधारण सभेमध्ये शिष्यवृत्ती परीक्षा, दहावी, बारावी, पदवी व पदव्युत्तर परीक्षेमध्ये विशेष प्राविण्य मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक ,ट्रॉफी ,रोख रक्कम व गुलाब पुष्प देऊन यथोचीत सत्कार करण्यात आला. तसेच डॉक्टर देविदास बामणे यांना उपन्यास सम्राट प्रेमचंद पुरस्कार मिळाल्याबद्दल व राजेंद्र जाधव यांची राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे इतिहास अभ्यासक विकसन समिती सदस्य म्हणून नियुक्ती झाली त्याबद्दल या दोन्ही शिक्षकांचा शाल श्रीफळ स्मृतीचिन्ह व गुलाब पुष्प देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी या सर्वसाधारण सभेमध्ये मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे, आर्थिक हिशोब पत्रकास मान्यता देणे, लेखापरीक्षण अहवाल वाचणे, दोष दुरुस्ती अहवाल मान्यता, नफा विभागणीस मंजुरी, वैज्ञानिक लेखापरीक्षक व अंतर्गत हिशोब तपासण्याची नियुक्ती करणे, नवीन वर्षाच्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे, सभासद भाग मर्यादा ,सभासद शेअर्स मर्यादा, पतसंस्थेच्या ठेवीचे व्याजदर ठरवणे त्याचबरोबर तज्ञ संचालक म्हणून श्री साळुंखे सर व अविनाश राणे यांची नियुक्ती करण्यात आली या सगळ्या विषयांबरोबरच उपस्थित सर्व संचालक व सेवक आणि सभासद यांना सहकार खात्याचा विशेष प्रशिक्षण देण्यासाठी राजेंद्र ढवळे यांनी अतिशय ओघवत्या भाषेमध्ये प्रशिक्षणाची माहिती देऊन सहकार खात्याचे नियम समजावून सांगितले. उत्तम सूत्रसंचालन संचालिका सुजाता जाधव तर आभार प्रदर्शन संतोष जाधव यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पतसंस्थेच्या कर्मचारी अक्षया पाटील जान्हवी मनवे भारती आवळे यासह संचालक मंडळाने विशेष मेहनत घेतली व कार्यक्रम यशस्वी केले.

# मनोज घरत यांच्यातर्फे मोफत शस्त्रक्रिया शिबीर



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : मनोज खरात यांच्यातर्फे डोंबिवली गोग्रास वाडी येथे स्वयंवर हॉलमध्ये भव्य आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते.या शिबिरात हृदयाची बायपास , सर्जरी मुतखडा सर्जरी प्रोटेस्ट सांध्यांची सर्जरी गर्भाशयाच्या गाठी कॅन्सर सर्जरी इसीजी काढणे बीपी शुगर एन्जिओप्लास्टी सर्जरी मोठ्या शस्त्रक्रिया याकरता तज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन लाभले या सेवेचा 200 नागरिकांनी लाभ घेतला या शिबिरात मोफत औषध वाटप करण्यात आले.यावेळी सचिव चहाचे, विद्यार्थी सेना उपाध्यक्ष प्रतीक देशपांडे अध्यक्ष संदीप असे मान्यवर उपस्थित होते.

# जीवनदीप महाविद्यालय खर्डीने पटकावले अजिंक्यपद

**जीवनदीप महाविद्यालय खर्डीने ५७ व्या युवक महोत्सवाचे जिल्हास्तरीय अजिंक्यपद ( चॅम्पियनशिप) पटकावले त्याबद्दल मुंबई विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ रविंद्र कुलकर्णी व मा. डॉ ममता अग्रवाल ( सचिव, अखिल भारतीय विद्यापीठ) यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. सन्मान स्विकारताना जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे सदस्य श्री प्रशांत घोडविंदे, प्रा. कैलास कळकटे ( प्र.प्राचार्य), प्रा.दिप्ती मोरे ( सांस्कृतिक विभाग प्रमुख)**




## मुरबाड नगरपंचायतच्या प्रभाग क्रं. २ मधील
# विविध विकासकामांचे आ. कथोरेंच्या हस्ते लोकार्पण

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : विकासापासून कोसो मैल दुर राहिलेल्या मुरबाड नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्रमांक 2 लांबाचीवाडी ,खरबेवाडी आदिवासी बहुल लोकवस्ती असलेल्या भागाचा चेहरा मोहरा बदलण्याचे महत्वपूर्ण काम तेथिल स्थानिक नगरसेविकेने केले आहे. आदिवासी बांधवांच्या दीर्घकालीन अपेक्षांना मूर्त स्वरूप देणारे विविध महत्त्वपूर्ण विकास प्रकल्प अखेर पूर्णत्वास पोहोचले असून, त्यांचे लोकार्पण सोहळे व भूमिपूजन कार्यक्रम शनिवार, दि. ०९ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता आयोजित करण्यात आला आहेत. या विकासकामांचे लोकार्पण कार्यसम्राट आमदार किसन कथोरे यांच्या शुभ हस्ते संपन्न होणार आहे. या भव्य दिव्य कार्यक्रमात श्रीहनुमान मंदिराची प्राणप्रतिष्ठा, तसेच महाराष्ट्रातील आदिवासी वस्तीतील पहिली वातानुकूलित दुमजली व्यायामशाळा व समाजहॉलचे लोकार्पण होणार आहे.

नगरसेविका सौ. मानसी मनोज देसले आणि समाजसेवक श्री. मनोज देसले यांच्या प्रयत्नाने व आमदार किसनजी कथोरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभागातील विकासाचे चित्र पालटले आहे. रस्ते कॉंक्रिटीकरण, स्ट्रीटलाईट्स, नाले-गटारे नुतनीकरण, अंगणवाडी, शाळा इमारत, ओपनजिम, हायटेक स्मशानभूमी, आणि पुरग्रस्त भागातील संरक्षण भिंती व सिमेंट रस्ते अशा



अनेक विकासकामांची यशस्वी अंमलबजावणी करण्यात आली आहे.

"प्रत्येक कृती प्रभागाच्या हितासाठी, प्रत्येक क्षण प्रभागाच्या विकासासाठी" हा मंत्र अंगीकारून कार्यरत असलेले देसले दांपत्य आज प्रभागवासीयांच्या विकासाचे आणि विश्वासाचे केंद्रबिंदू ठरले आहेत. त्यांच्या कार्यकुशलतेमुळे, लोकसहभागातून स्वाभिमान निर्माण करणारी विकासप्रवृत्ती रुजली आहे.या लोकार्पण सोहळ्यात जनतेचा सहभाग हीच खरी ताकद असल्याने, परिसरातील सर्व नागरिकांनी 9 ऑगस्ट क्रांती दिनी ऐतिहासिक प्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या विकासाचे साक्षीदार व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## पलावा येथे
# काशिनाथ पाटील यांच्यातर्फे मोफत छत्री वाटप



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : काटई गावचे माजी सरपंच, राजू पाटील यांचे कट्टर समर्थक काशिनाथ पाटील यांच्यातर्फे कासाबेला पलावा येथे ज्येष्ठ नागरिकांना मोफत छत्री वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

समाजातील तळागाळातील आणि वंचित समूहातील गरजू नागरिकांना वैद्यकीय मदत सेवाभाव तसेच अनेक गरीब विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य याशिवाय शैक्षणिक साहित्याचे वाटप असे विविध प्रकारचे कार्यक्रम काशिनाथ पाटील करीत असतात. या उपक्रमाला भरभरून दाद मिळाली शेकडो ज्येष्ठ नागरिकांनी या सेवेचा लाभ घेतला या कार्यक्रमासाठी मनसेचे क्रांती पाटील माजी नगरसेवक प्रभाकर जाधव साईनाथ भोईर हरेश पाटील संजय भोईर विनोद चौधरी राजेश पाटील अनिल पाटील डॉक्टर शुभम मिश्रा फुलाजी पाटील रामकृष्ण पाटील तसेच महिला पदाधिकारी सोनाली, काव्या डिचोलकर साथिया खान काव्य रोहिणी खापेकर अशा अनेक मान्यवरांनी या कार्यक्रमात उपस्थिती दर्शवली होती.

# शिक्षकांनी केवळ ज्ञानदान नव्हे तर मूल्यसंस्काराचीही जबाबदारी पार पाडावी

## गुरूतत्व कार्यक्रमातून वारे गुरूजींचे प्रतिपादन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कुडूस : सरकारी शाळेतील शिक्षक हे विद्यार्थ्याप्रति प्रामाणिक, निस्पृह व समर्पित असतात. त्यांनी केवळ ज्ञानदान नव्हे तर मूल्यसंस्कारांची जबाबदारी पार पाडली पाहीजे, असे प्रतिपादन ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ वारे गुरूजी यांनी चिंचघर येथील नॅशनल एज्युकेशन सोसायटीच्या सभागृहात शिक्षकांना मार्गदर्शन करताना गुरूतत्व 2025 या कार्यक्रमातून केले.




पुढे बोलतांना वारे गुरजीं म्हणाले, विद्यार्थ्यांच्या समृद्ध भविष्यासाठी शिक्षकांनी भेदभाव न करता केवळ त्यांच्या उज्वलतेसाठी काम करावे. हेच गुरूतत्वचे खरे मर्म आहे. शाळेतील बहुभाषिक विद्यार्थी, दुर्गम भाग आणि अपु-या भौतिक सुविधा ह्या बाबी आव्हान नसून याला संधी मानून काम केले पाहीजे. प्रतिकूल परिस्थितीला नावे न ठेवता, आहे ती परिस्थिती स्विकारून शिक्षकांनी ती बदलली पाहीजे आणि ती बदलण्याचे काम केवळ शिक्षकच करू शकतात. परिषदेत भारतीय शिक्षण प्रणालीची पुर्नकल्पना मांडण्यात आली. डिजिटल शिक्षणाचे आव्हान पेलून मूल्याधारीत शिक्षणावर भर देत जागतिक स्तरावरील शाळा शक्य आहेत. यावर सखोल विचार मांडण्यात आले.

परिषदेचे संचालन अर्चना चौधरी यांनी केले तर उपस्थितांचे आभार राजन गरूड यांनी मांडले.

जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५•२६)
पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
एम.ए (एमसीजे)
(मास्टर ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅग्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in



# आजचे राशि भविष्य



**मेष**
तुम्ही जे ध्येय साध्य करण्याचा प्रयत्न करत आहात ते आज साध्य होऊ शकते. आज तुम्हाला तुमचे लक्ष्य साध्य करण्यासाठी अधिक मेहनत करावी लागेल.

**वृषभ**
व्यवसायात तुम्हाला फायदा होईल.दिवस तुमच्यासाठी उत्साहाने भरलेला असणार आहे. व्यवसायात तुम्हाला कोणाची तरी मदत घ्यावी लागेल.

**मिथुन**
महत्त्वाची कामे सकारात्मक दृष्टिकोनाने पूर्ण करता येतील. व्यावसायिक बाबतीत आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी कठोर परिश्रम करावे लागतील.

**कर्क**
विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस चांगला जाणार आहे. कामाला नवीन स्वरूप देण्यासाठी तुम्हाला काही सर्जनशील क्रियाकलापांमध्ये देखील रस असेल.

**सिंह**
काम कितीही कठीण असले तरी एकाग्रता टिकवून ठेवावी लागेल.तुम्हाला ऑफिसमध्ये नवीन प्रोजेक्ट मिळेल, तुमच्या सहकाऱ्यांची मदत मिळेल.

**कन्या**
तुम्हाला वादविवादांपासून दूर राहावे लागेल जेणेकरून कामावर लक्ष केंद्रित करू शकाल.वैयक्तिक समस्या सुटल्यानंतर मानसिक शांती मिळेल.

**तूळ**
विरोधक तुमचे नुकसान करण्याचा अयशस्वी प्रयत्न करतील. या राशीचे लोक जे सरकारी सेवेत आहेत त्यांना काही उत्कृष्ट असाइनमेंट मिळू शकते.

**वृश्चिक**
विद्यार्थ्यांना स्पर्धेशी संबंधित कार्यात यश मिळू शकते. आज तुम्हाला नवीन कामाचा विचार करण्याची पूर्ण संधी मिळू शकते.

**धनु**
विद्यार्थ्यांसाठी दिवस चांगला जाईल .व्यावसायिक संपर्क मजबूत करण्याचा प्रयत्न कराल आणि एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीशी भेटणे फायदेशीर ठरेल.

**मकर**
कामाच्या ठिकाणी तुमचे काम चांगले होईल. तुम्हाला काही कामात मदत लागेल, या बाबतीत तुम्हाला एखाद्या चांगल्या मित्राचा सल्ला मिळेल.

**कुंभ**
कोणतेही नियोजित काम पूर्ण होईल.काही काम करण्याच्या नवीन पद्धतीचा विचार कराल, यामुळे काम वेळेवर आणि सहजतेने पूर्ण होण्यास मदत होईल.

**मीन**
विद्यार्थ्यांना अभ्यासात अजून मेहनत करावी लागेल. कौटुंबिक वातावरण आनंददायी राहील.कुटुंबातील सदस्यांसोबत चांगला वेळ घालवायला मिळेल.

जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
जीवनदीप महाविद्यालय, गोवेली
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B- Grade) प्राप्त
११ वी व १२ वी
कला, वाणिज्य, विज्ञान (IT / CS)
UNDER GRADUATION: B.Sc Data Science, B.Sc IT, B.Sc Chemistry Maths, BMS, BAF, B.Com, BAMMC, B.A.
POST GRADUATION: M.Sc IT, M.Sc Chemistry, M.Com Advanced Accountancy, MAMMC, M.A. Marathi, M.A. Economics, M.A. History, M.A. Sociology, M.A. Geography
Admission Open 2025-2026
आपलं कॉलेज हक्काचं कॉलेज
आजच आपला प्रवेश निश्चित करा!
7775851123, 8108559566
9619188558



# ‘कॉटन टू क्लॉथ’च्या माध्यमातून महाराष्ट्र आणि दक्षिण कोरिया यांच्यात व्यापारवृद्धी

## – राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : महाराष्ट्र आणि दक्षिण कोरिया दरम्यान वस्त्रोद्योग क्षेत्रात व्यापारवृद्धीची मोठी संधी आहे. महाराष्ट्रातील कापूस आणि दक्षिण कोरियातील टेक्स्टाईल मशिनरी यांच्या माध्यमातून भागिदारीने परस्पर संबंध अधिक वृद्धींगत होतील, असा विश्वास राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी व्यक्त केला.

दक्षिण कोरियाचे महावाणिज्यदूत डोंगवान यू यांनी मंत्री श्री.रावल यांची सह्याद्री अतिथीगृह येथे सदिच्छा भेट घेतली. यावेळी महाराष्ट्र आणि कोरिया दरम्यान व्यापारवृद्धीच्या विविध संधींवर चर्चा करण्यात आली.

राजशिष्टाचार मंत्री रावल म्हणाले, महाराष्ट्र हे भारताचे पॉवर हाऊस आहे. उत्पादन क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यावर भर देऊन महाराष्ट्र आणि कोरियादरम्यान व्यापारवृद्धीच्या संधी निश्चित करण्यावर भर देणे गरजेचे आहे. महाराष्ट्रात कुशल मनुष्यबळ उपलब्ध असल्याने महाराष्ट्र आणि कोरियामध्ये गुंतवणूक आणि व्यापाराच्या विविध संधी विचारात घेऊन इच्छुकांना प्रोत्साहन देता येईल. विशेषत: महाराष्ट्रातील कापूस आणि कोरियातील टेक्स्टाईल मशिनरी यांच्या माध्यमातून भागिदारीने व्यापार करुन परस्पर संबंध वृद्धींगत होतील, असा विश्वास मंत्री रावल यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्रात मुंबई-पुण्याबरोबरच विविध जिल्ह्यांमध्ये उद्योजकांना सोयी सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात आहेत. महाराष्ट्र ॲग्रो प्रोसेसिंग बरोबरच फळे, भाजीपाला निर्यातीत अग्रेसर असून कोरियाच्या उद्योजकांचे राज्यात स्वागतच केले जाईल, असेही मंत्री रावल यांनी यावेळी सांगितले.

कोरियन महावाणिज्यदूत डोंगवान यू यांनी व्यापार आणि गुंतवणुकीच्या दृष्टीने महाराष्ट्र हे भारतातील महत्त्वाचे राज्य असल्याचे सांगितले. मुंबई-पुणे परिसरात विविध उत्पादनांच्या अनेक कोरियन कंपन्या असल्याचे सांगून येत्या 12 ऑक्टोबर रोजी मुंबईत होणाऱ्या कोरियन महोत्सवासाठी त्यांनी मंत्री रावल यांना निमंत्रण दिले.

# रामसेनेच्या कावड यात्रेचा भाविकांनी घेतला लाभ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : गेली कित्येक वर्षापासून पवित्र श्रावण महिन्याच्या सोमवारी राम सेनेच्या वतीने कावड यात्रेसह अनेक धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. सालाबादप्रमाणे याही वर्षी श्रावणी सोमवारी रामसेनेच्या वतीने रुपादेवी मंदिर, इंदिरानगर, वागळे इस्टेट ठाणे ते कौपीनिकेश्वर महादेव मंदिर पर्यंत दिनांक 04 ऑगस्ट 2025 रोजी कावड यात्रेचे आयोजन करण्यात आले होते.





आमदार निरंजन डावखरे यांनी राम सैनिकांसह कौपीनिकेश्वर मंदिरात जलाभिषेक केला. कावड यात्रेमध्ये 3000 भाविकांनी सहभाग घेतला होता.

यामध्ये समाजसेवक महेंद्र सोंडारी, माजी नगरसेवक अमित सरैया, माजी नगरसेवक दिलीप बारटक्के, माजी नगरसेवक राजकुमार यादव, रत्नेश दुबे, रोटरी क्लब ठाणे पैशनच्या अध्यक्ष गीतांजली देवखिले, सचिव जयश्री सोलंकी, श्री विभूती प्रकाशानंदजी विद्यालयाचे मुख्याध्यापक कुंवर राकेश गंभीर सिंह तोमर सह उद्योगपती, समाजसेवक व भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदरची कावड यात्रा यशस्वी करण्यासाठी रामसेनेचे संस्थापक ॲड सुनील सिंह यांचे नेतृत्वाखाली सनातनी, रामसेना युवा, राम सेना संचलित संस्थेचे सदस्य, पोलीस प्रशासन यांनी मेहनत घेतली. राम सेनेचे संस्थापक अध्यक्ष सुनील सिंह यांनी कावड यात्रेमध्ये सहभागी झालेल्या सर्व भाविक भक्तांचे आभार व्यक्त केले.


## ठाणे महानगरपालिका, ठाणे

सार्वजनिक उत्सव प्रसंगी उभारण्यात येणाऱ्या मंडप परवानगीसाठी
ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणेबाबत जाहिर आवाहन

- ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक उत्सव मंडळांना या जाहिर आवाहनाद्वारे सुचित करण्यात येते कि, ठाणे महानगरपालिका क्षेत्रात सार्वजनिक उत्सव (दहीहंडी, गणेशोत्सव, नवरात्रौत्सव इ.) प्रसंगी सार्वजनिक ठिकाणी (रस्ते/पदपथावर) तात्पुरते स्वरुपात मंडप उभारण्याकरिता परवानगी मिळणेसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याकरीता ठाणे महागरपालिकेने संगणक प्रणालीची सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे.
- सार्वजनिक उत्सव मंडळांनी ऑनलाईन सुविधेचा वापर करुन मंडप परवानगीसाठी अर्ज करावेत.
- ऑनलाईन पध्दतीने अर्ज केल्यास मंडळांना पोलीस, वाहतूक पोलीस व अग्निशमन विभागाकडे परवानगीसाठी किंवा ना हरकत दाखल्यासाठी जाण्याची गरज लागणार नाही.
- ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची सुविधा थेट tmcmandap.vidhsiddinfotechllp.com या लिंकवर व ठाणे महानगरपालिकेच्या www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर "मंडप परवानगी" या शीर्षाखाली उपलब्ध आहे. सदरची लिंक दि.२३/०८/२०२५ पर्यत सुरु राहणार आहे. त्यापुर्वीच सर्व मंडळांनी ऑनलाईन सुविधेचा वापर करुन परवानगीसाठी अर्ज करावेत.
- मंडप परवानगीसाठी केलेल्या ऑनलाईन अर्जासोबत मागील वर्षी दिलेल्या परवानगीची प्रत, मंडप उभारण्यात येणाऱ्या जागेचा रफ नकाशा, मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची नावे व मोबाईल नबरसह यादी व मंडपात अग्निशमन सिलेंडर (Fire Extinguisher) ठेवल्याबाबतचे अधिकृत अनुज्ञप्तीधारकाकडील प्रमाणपत्राची प्रत pdf स्वरुपात अपलोड करावी
- सार्वजनिक उत्सव मंडळांनी दहीहंडी, गणेशोत्सव व नवरात्रौत्सवासाठी सार्वजनिक ठिकाणी तात्पुरते स्वरुपात मंडप उभारण्याकरीता ठाणे महानगरपालिकेच्या धोरणानुसार आवश्यक ती परवानगी घेतल्यानंतरच मंडप उभारण्यास सुरुवात करावी.
- मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार परवानगी पत्राची प्रत मंडप उभारण्याच्या ठिकाणी किंवा मंडपाच्या दर्शनी भागावर लावणे बंधनकारक असेल. परवानगी पत्राची प्रत दर्शनी भागावर न लावल्यास सदरचे मंडप विनापरवानगी उभारले आहे असे गृहीत धरुन सदर मंडळाच्या पदाधिकाऱ्या विरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.
- मंडळांना ऑनलाईन अर्ज करतांना कोणत्याही प्रकारची अडचण उद्धवल्यास संबधित प्रभाग कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त यांचेशी तसेच भ्रमणध्वनी क्र. ८०९७१९२८६८ वर संपर्क साधावा.
- मा.उच्च न्यायालयाचे आदेश, शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना व ठाणे महानगरपालिकेच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करुन सार्वजनिक उत्सव साजरा करावा व ठाणे महानगरपालिकेस सहकार्य करावे.

ठामपा/पिआरओ/अ.नि. नि वि/४९३/२०२५-२६
दि.०४/०८/२०२५
Pls visit our official web-site
www.thanecity.gov.in

सही/-
उपायुक्त
अतिक्रमण व निष्कासन विभाग
ठाणे महानगरपालिका, ठाणे


# भिवंडी महानगरपालिकेत लोकशाही दिन संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार महानगरपालिका स्तरावर लोकशाही दिन दि.०४ ऑगस्ट २०२२ रोजी मा .प्रशासक तथा आयुक्त सो. यांचे सभागृह, नविन प्रशासकीय इमारत, तिसरा मजला, भिवंडी महानगरपालिका (मुख्यालय) येथे आयोजित करण्यात आला होता. सदर लोकशाही दिनी २ तक्रारी अर्ज प्राप्त झाले असून अर्ज हे अनधिकृत बांधकामासंबंधि व अग्निशमन व इतर परवानगी संदर्भात असून सदर अर्ज प्रभाग समिती क्र. ५ व अग्निशमन विभागाशी संबंधित होते. सदर अर्जावर योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश मा. अति. आयुक्त सो. यांनी संबंधित विभाग प्रमुख यांना दिले.

तसेच यापुढील लोकशाही दिन सोमवार दि.०१/०९/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता मा. आयुक्त सो. यांचे सभागृह, नविन प्रशासकीय इमारत, तिसरा मजला, भिवंडी महानगरपालिका (मुख्यालय) येथे आयोजित करण्यात येणार असून ज्या अर्जदारांना लोकशाही दिनी तक्रार करावयाची असेल त्यांनी आपला तक्रारी अर्ज दि.१८/०८/२०२५ पुर्वी विहीत नमुन्यात ३ प्रति मध्ये माहिती व जनसंपर्क विभागात सादर करावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

# डोहोळे येथील शक्ती हनुमान मंदिराचा वर्धापन दिन भक्तिभावात साजरा





दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : भिवंडी तालुक्यातील मुंबई नाशिक महामार्गावरील डोहोळे येथील श्री शक्ती हनुमान मंदिर जिर्णोद्धार वर्धापन दिन सोहळा विविध अध्यात्मिक कार्यक्रमाव्दारे उत्साहात संपन्न झाला.

शक्ती लॉजेस्टीक पार्क मध्ये तीन वर्षापूर्वी राजस्थान मधील विशिष्ठ प्रकारचा दगड आणुन शक्ती गृपच्या वतीने सुबक अशी श्री हनुमान मंदीराची उभारणी करण्यात आली. त्याचा ३ रा जिर्णोद्धार वर्धापन दिन सोहळा रविवार दिनांक ३ ऑगस्ट रोजी शक्ती परिवार व गृप ग्रामपंचायत डोहोळे यांच्या संयुक्त विद्यमाने शक्ती लॉजेस्टीक पार्क कार्यालयाच्या प्रांगणात असलेल्या हनुमान मंदिरात दरवर्षी प्रमाणे यावर्षीही घेण्यात आला यावेळी एकदिवसीय श्री विष्णू याग, अभिषेक होमहवन, महाआरती, मंत्रपुष्पांजली, भजन आदी अध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तर आकर्षक विद्युत रोषणाई सह विविध फुलांनी मंदीर सजविण्यात आले होते.यावेळी डोहोळे व परिसरातील नागरीक, कर्मचारी, महीला, तरुणांनी मंदीरात दर्शनासाठी व महाप्रसाद घेण्यासाठी गर्दी केली होती. तर यावेळी परिसरातील विविध क्षेत्रातील पदाधिकारी, उद्योजक, नामवंत प्रतिष्ठीत नागरीक मान्यवर उपस्थीत होते.

# ‘घर घर संविधान’ अभियानातंर्गत केडीएमसीची जनजागृती

दै.ठाणे जीवनदीप वार्ता




कल्याण : "घर घर संविधान" या अभियानातंर्गत महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या निर्देशान्वये महापालिका पर्यावरण व प्रदुषण नियंत्रण विभागाच्या कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन डोंबिवली पूर्व येथील संत तुलसीदास कडोंमपा हिंदी शाळा क्र. 86/2 येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमात "पर्यावरण विषयक संकल्पना व कायदे" या विषयाच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या मध्ये महानगरपालिका शालेय विदयार्थ्यांना एल.एल.बी व्दितीय वर्षीय अभ्यासकांकडून आणि पर्यावरण तज्ञ वैशाली तांबट यांचे कडून संविधानातील पर्यावरण विषयक कायदयाचे व इतर कायदयाचे महत्त्व विषद करण्यात आले.

तसेच या कार्यक्रमात पर्यावरणाचे संतुलन राखण्याचे महत्त्व पटवून देण्यासाठी व आपत्तीचा सामना करण्याबाबत विदयार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी एनडीआरएफ जवानांचे प्रात्यक्षिक व व्याख्यानाचे आयोनजही करण्यात आले होते. याच कार्यक्रमात पर्यावरण व प्रदुषण नियंत्रणामार्फत एनडीआरएफ जवानांसोबत रक्षा बंधन साजरे करीत भारतीय संस्कृतीचे महत्त्व देखील पर्यावरण विभागाने अधोरेखीत केले.

या कार्यक्रमास आमदार राजेश मोरे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. आमदार राजेश मोरे यांनी उपस्थित विदयार्थ्यांना पर्यावरण संरक्षण ही फक्त एकाची जबाबदारी नसून ती सामुहिकरित्या सर्वांची जबाबदारी असल्याचे सांगत विदयार्थ्यांना संबोधित केले. यावेळी पर्यावरण व प्रदुषण नियंत्रण विभागाच्या कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे, उप अभियंता मुराई, एनडीआरएफ जवानांचे मुख्य वरिष्ठ निरिक्षक दिलीप कुमार, वरिष्ठ निरिक्षक विश्वनाथ दुधीया, महापालिकेचे अग्निशमन दलाचे उप अग्निशमन अधिकारी रवि गोवारी, फ प्रभागाच्या सहा.आयुक्त हेमा मुंबरकर व पर्यावरण व प्रदुषण नियंत्रण विभागाचे इतर अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.




# शिक्षकांच्या अनुदासाठी आ. ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी फेडला पांडुरंगाला केलेला नवस

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : महाराष्ट्र राज्यातील अंशतः अनुदानित, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांना वेतन अनुदानाचा वाढीव टप्पा मिळावा यासाठी अविरत प्रयत्न करत असताना या प्रयत्नांना दैवी ताकद मिळावी म्हणून आषाढीला एकादशीच्या दिवशी पंढरपूरच्या विठ्ठलाला आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी नवस केला होता. दि.09 जुलै 2025 रोजी शासनाने महाराष्ट्रातील अंशतः अनुदानित, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना वेतन अनुदानाचा वाढू टप्पा देत असल्याचे मान्य केले. यासाठी लागणारे 970 कोटी रुपयांची तरतूद देखील दि.17 जुलैच्या मंत्रिमंडळ बैठकीत करण्यात आली. दि. 18 जुलैला पावसाळी अधिवेशन संपण्यापूर्वी शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी सभागृहात राज्यातील अंशतः अनुदानित, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना दि.01 ऑगस्ट 2025 पासून वाढीव 20 टक्के वेतन अनुदानाचा टप्पा देत असल्याचे जाहीर करत निवेदन सादर केले. यासाठी अधिवेशन काळात झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत शिक्कामोर्तबही करण्यात आले.



या नंतर दिलेल्या शब्दांप्रमाणे अनुदान वितरणचा आदेश व प्रत्यक्ष शिक्षकांच्या खात्यात वाढीव टप्प्याचा पगार पाडण्यासाठी आमदार ज्ञानेश्वर म्हात्रेंसह अन्य शिक्षक व पदवीधर आमदारांनी विशेष प्रयत्न केले. मंत्री गिरीश महाजन, चाळीसगावचे आमदार मंगेश चव्हाण, शिक्षक समन्वय संघाचे प्रतिनिधी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली असता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वाढीव टप्पा हा ऑगस्ट पेड एन सप्टेंबर असा 100% दिला जाईल असे सांगितले. तसेच जो शब्द सरकारने अधिवेशन काळा दिला आहे तो प्रत्यक्षात पूर्ण केला जाईल असे स्पष्ट सांगितले. राज्यातील अंशतः अनुदानित शिक्षकांचे टप्पा वाढीची मागणी मान्य होत असल्याने आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी अंशतः अनुदानीत शिक्षकांसमवेत प्रत्यक्ष पंढरपूरला जाऊन विठ्ठल व रखुमाईचे दर्शन घेत विठ्ठलाला केलेला नवस पूर्ण केला. यावेळी पंढरपूरच्या राज्य परिषद सदस्य व मंदिराच्या ट्रस्टी श्रीमती शकुंतला नडगिरी यांच्या वतीने आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांचा सन्मान करण्यात आला. तसेच दुर्मिळ कान्होपात्रा या दुर्मिळ वृक्षाचे रोपण करण्यात आले. यावेळी सुनील जगताप, दैलत भावार्थे, शैलेश गोऱ्हे, अरुण घोडविंदे सह शिक्षक उपस्थित होते.

# महसूल विभागामार्फत पेण परिसरात वृक्षारोपण







दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : महसुल विभागामार्फत राज्यात १ ऑगस्ट हा "महसूल दिन" म्हणून साजरा केला जातो. रायगड जिल्हयात १ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट या कालावधी मध्ये "महसूल सप्ताह" साजरा करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने ३ ऑगस्ट रोजीझ "पाणंद आणि शिवरस्त्यांची मोजणी करुन त्यांच्या दुतर्फा झाडे लावणे हा उपक्रम राबविण्यात आला.

महसूल विभाग हा प्रशासनाचा प्रमुख भाग आहे. गाव, तालुका व जिल्हा पातळीवर मोलाची भूमीका बजावत असतो, महसूली अभिलेखाचे लेखांकन निवडणूक, सामाजिक अर्थसहाय्याच्या योजना, विविध दाखल्यांचे वाटप, नैसर्गिक आपत्ती "पाणंद शिवरस्त्यांच्या दुतर्फा झाडे लावणे, सर्वांसाठी घरे, या सारख्या महत्वपूर्ण कामांची जबाबदारी महसूल विभागावर असल्याने महसूल विभागाला प्रशासनाचा कणा असे म्हटले जाते.असेच पेण तालुक्यातील सर्व पाणंद शिवारस्त्यांच्या दुतर्फा झाडे लावण्याकरीता सामाजिक वनीकरण विभागाकडून झाडे उपलब्ध करुन घेण्यात आली. यावेळी पेण उपविभागीय अधिकारी प्रविण पवार तहसीलदार तानाजी शेजाळ, निवासी नायब तहसीलदार प्रसाद कालेकर, मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, महसूल सेवक, स्थानिक लोकप्रतिनिधी, शेतकरी व इतरांची मदत घेऊन खालील पाणंद शिवार स्त्यांच्या दुतफां झाडांची लागवड करण्यात आली. तसेच त्यांची देखभाल करण्याकरीता संबंधित शेतक-यांना जबाचदारी देण्यात आली. झाडे लागवड केलेली ठिकाणामध्ये पेण कामार्ली, हमरापूर, वारूळ, खारपाडा वडखळ तांबडी आदिवासी वाडी या परिसरात रस्ता लगत मोठ्या तलावाच्या बाजूलाअशी विविध झाडे लावण्यात आली.

# कासा रिओ व कासा गोल्ड को-ऑप. हाउसिंग सोसायटीच्या निवडणूकीवर सभासद आणि रहिवाशांचा आक्षेप

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : डोंबिवली मध्ये प्रसिद्ध कासा रिओ व कासा गोल्ड को-ऑप. हाउसिंग सोसायटी मध्ये अंतर्गत 210 इमारती असून यामध्ये 39 सोसायटी रजिस्टर आहेत.तर यामध्ये 10,700 फ्लॅट धारक येथे राहतात.दरम्यान या कासा रिओ व कासा गोल्ड को-ऑप.हाउसिंग सोसायटीची रविवारी 3 ऑगस्ट निवडणूक प्रक्रिया पार पडली असून या निवडणुकीवर सोसायटी मधील मेंबर आणि राहिवासी यांनी आक्षेप घेतला आहे...



दरम्यान याबाबत सोसायटी मधील मेंबरकडून सांगण्यात आले की निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया अपारदर्शक आहे. उपनिबंधकाकडे आक्षेप नोंदवून सुद्धा त्याकडे लक्ष दिले नाही. उपनिबंधाकांकडे पत्र दिलं होते, आमचे बायलॉज पहिले रिपेअर करा मग निवडणुका लावा. तसेच डिफॉल्टरची लिस्ट पब्लिश करायला पाहिजे होती, ती पब्लिश न करता निवडणुका लावल्या आहेत. जे सोसायटीमध्ये मेंबर नाही आहेत, तरी हे या निवडणुकीत उभे आहेत. या निवडणुकीत कुठल्या ही प्रकारचे नियम पाळले गेले नाही आहेत. एकूण ३९ प्रतिनिधी सभासद असताना त्यातून २१ सदस्यांची मॅनेजिंग कमिटी तयार करण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे, जो स्पष्टपणे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व मॉडेल बाय-लॉजच्या विरोधात आहे. कायद्याप्रमाणे, मॅनेजिंग कमिटीचे सदस्यसंख्येचे प्रमाण एकंदर जनरल बॉडीच्या तुलनेत मर्यादित असावे लागते. त्यामुळे या बाबतीत कायदेशीर वैधतेचा प्रश्न निर्माण झाला आहे, असे सोसायटी मधील मेंबरकडून सांगण्यात आले आहे. तसेच हे प्रकरणं न्यायप्रविष्ठ असून निवडणूक प्रक्रिया पार पडल्यानंतर पुन्हा आम्ही न्यायालयात जाणार आहोत असे समीर कोंडालकर आणि वंल्लभकांत पांडे यांनी सांगितले...

याविषयी निवडणूक अधिकारी श्रीकांत पाटील म्हणाले, माझ्याकडे जी यादी आलेली आहे ती डिफॉल्टर ची लिस्ट आलेली आहे, ओउटस्टँडिंग ची लिस्ट आलेली नाही. अशा संस्थांवर कुठल्याही प्रकारची सहकार कायद्यातील तरतुदीप्रमाणे कारवाई झालेली नाही. त्यामुळे डिफॉल्ट च्या व्याख्या मध्ये ती येत नाही. माझ्याकडे अंतिम यादी दिल्यानंतर अंतिम यादी ज्यांची नावं समाविष्ट आहे त्यांचा निवडणूक मध्ये नॉमिनेशन करणं किंवा त्यांना मतदान करू देणे हे माझं कर्तव्य आहे असे निवडणूक अधिकारी पाटील यांनी सांगितले...



# वाडा भिवंडी महामार्गावर चालत्या ट्रकला आग

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

वाडा : वाडा तालुक्यातील खुपरी गावाजवळ बॅटरी घेऊन जाणाऱ्या ट्रकला अचानक भीषण आग लागल्याची घटना घडली या आगीत ट्रकचा बराचसा भाग जळाला असून लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे.

मिळालेल्या माहितीनुसार कुडूस कडून वाड्याच्या दिशेने जाणारा ट्रक स्क्रॅप बॅटरी घेऊन जात असताना ट्रक मधील जुन्या बॅटऱ्यांमध्ये घर्षण झाल्याने ही आग लागली असावी. काही क्षणातच ट्रकने पेट घेतला त्याचवेळी मागून पोलिसांचे वाहन येत होते पोलीस उपनिरीक्षक सागर मालकर व सोबतच्या पथकाने वाडा नगरपंचायत चे मुख्याधिकारी यांना संपर्क करून अग्निशमन दलाला पाचारण केले आणि तोपर्यंत वाहतुकीवर नियंत्रण ठेवले. अग्नीशमन दल, स्थानिक नागरिक व पोलिसांच्या मदतीने आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे.

### 'महसूल सप्ताह' अंतर्गत
## खर्डीत पाणंद शिव रस्त्याचा सर्व्हे
### रस्त्याच्या दुतर्फा होणार वृक्षारोपण १ ते ७ ऑगस्ट दरम्यान आयोजन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावतीने राज्यात सर्वत्र 1 ऑगस्ट ते 7 ऑगस्ट दरम्यान 'महसूल सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.या महसूल सप्ताह दरम्यान शासकीय जागेवर 2011 पर्यंत रहिवास प्रयोजनार्थ अतिक्रमण करून रहात असलेल्या कुटूंबाचे अतिक्रमण नियमनुकूल करून त्या कुटूंबाना त्या जागेचे पट्टे वाटप कार्यक्रम करण्यात येणार आहे त्यामुळे वर्षानुवर्षे शासकीय जागेवर घर बांधून रहाणाऱ्या रहिवाशांना हक्काची जमीन उपलब्ध होऊन ते त्या जागेचे कायमचे मालक होणार आहेत.त्या अंतर्गत महसूल संबंधी विविध उपक्रम गावागावात राबविण्यात येणार आहे.

शहापूर तालुक्यातील खर्डी महसूल मंडळ अंतर्गत "महसूल सप्ताह २०२५" या उपक्रमातंर्गत तहसिलदार परमेश्वर कासुळे यांच्या मार्गदर्शना 3 ऑगस्ट 2025 रोजी टेंभे सजा अंतर्गत येणाऱ्या टेंभे गाव ते नवीन आरोग्य केंद्र, दहिगाव तलाठी सजाअंतर्गत अंबाडी पाडा ते पिंपळपाडा व अजनुप तलाठी सजा अंतर्गत अजनूप ते गोपाळपाडा पाणंद अश्या तीनही रस्त्याचे सर्व्हे करून मोजमाप करण्यात आले. या रस्त्याच्या दुतर्फा सामाजिक वनीकरण विभाग,शासकीय नर्सरी किंवा वन विभाग नर्सरी यांच्या कडून रोपे उपलब्ध करून रोजगार हमी योजनेंतर्गत वृक्षारोपण करण्यात येणार आहे.याठिकाणी ग्रामपंचायत मार्फत झाडे लावण्याकरिता खड्डे करण्यात येणार असून स्थानिक गावकऱ्यांच्या श्रमदानातून झाडांची लागवड करण्यात येईल.पाणंद शिवरस्त्यांची मोजणी करून त्यावर असलेले अतिक्रमण मुक्त करून त्यांच्या दुतर्फा झाडे लावण्यात येणार असल्याचे खर्डीचे मंडळ अधिकारी अजय अरबाड यांनी सांगितले.या रस्त्यांच्या सर्व्हेसाठी रविवार असूनही मंडळ अधिकारी अजय अरबाड, खर्डीचे ग्राम महसूल अधिकारी योगेश भोई, गोलभनचे बजरंग इंगळे, दळखणचे निनाद नेवरेकर, टेंभेच्या तेजश्री विधाते, दहिगावचे कदम मागी व अजूनपचे कपिल बांबळे हे स्थळ पाहणी करण्यासाठी उपस्थित होते.

# भिवंडीत शिवसेनेची मोर्चेबांधणी

### जिल्हापरिषदेवर भगवा फडकवण्यासाठी शिवसैनिकांनी सज्ज रहावे -भिवंडी तालुका प्रमुखांचे आवाहन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : ठाणे जिल्हा व विशेष करून भिवंडी हा शिवसेना पक्षाचा बालेकिल्ला आहे.याचे महत्त्वाचे कारण म्हणजे येथील शिवसैनिकांनी प्रामाणिकपणे शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे व पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे,स्व. आनंद दिघे यांच्या नेतृत्वाखाली काम करून पक्ष वाढवून मजबूत केला आहे.गत जिल्हा परिषद निवडणुकीत शिवसेनेचे उमेदवार घवघवीत यश मिळवून विजयी झाले होते,त्यामुळे आगामी होणाऱ्या ग्रामपंचायत,पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत शिवसैनिकांनी एक दिलाने एकजूट होऊन पक्षाचे काम करून जास्तीत जास्त शिवसेना पक्षाचे उमेदवार निवडून आणून ग्रामपंचायत,पंचायत समिती व ठाणे जिल्हा परिषदेवर शिवसेना पक्षाचा भगवा झेंडा फडकवण्यासाठी सज्ज रहा असे आवाहन उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे भिवंडी तालुका प्रमुख करसन ठाकरे यांनी केले आहे.

आगामी होणाऱ्या ग्रामपंचायत पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी शिवसेनेचे तालुका प्रमुख करसन ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली पक्ष पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मतदार व शिवसैनिकांशी संपर्क साधून मोर्चा बांधणी सुरू केली आहे.याचाच एक भाग म्हणून जिल्हा परिषद गटनिहाय प्रभाग रचना व निवडणूक प्रचार संघटात्मक कामाचा आढावा घेण्यासाठी भिवंडीतील राजनोली येथील शिवसेना ठाणे जिल्हापरिषदे जनसंपर्क कार्यालयात नुकतीच तालुका प्रमुख करसन ठाकरे यांनी पदाधिकाऱ्यांची विशेष बैठक घेतली यावेळी शिवसेना उपनेते विश्वास थळे,सोन्या पाटील, संपर्कप्रमुख साईनाथ तारे, कुंदन पाटील,जि.प.च्या माजी सभापती दर्शना ठाकरे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सर्वांनी जिल्हा परिषद गटाची माहिती देऊन एक दिलाने काम करायचे आवाहन केले. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली स्वबळावर निवडणूक लढविण्याची तयारी सुरू केली असून भविष्यात महाविकास आघाडी बरोबर सुद्धा निवडणूक लढवण्याबाबत वरिष्ठस्तरावर निर्णय घेण्यात येणार असल्याची माहिती ठाकरे यांनी दिली.पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्तेनी एकत्र येऊन जिल्हा परिषद गट प्रभागाचा आढावा घेऊन कामाला सुरुवात करावी,आगामी निवडणुकीत शिवसेनेचा भगवा फडकवा असे आवाहन तालुका प्रमुख ठाकरे यांनी बैठकीत केले आहे.

प.पू.स.रमणनाथजी महाराज संजीवन समाधी ट्रस्ट
भोगावती नगर (तानसा), ता. शहापूर, जि.ठाणे



ज्ञानमार्ग त्यागप्रधान आहे. भक्तीमार्गात समर्पणाचे प्राधान्य आहे. ज्ञानी कोणाचाही निषेध करीत नाही. साधारण माणसासाठी ज्ञानमार्ग सोपा नाही. माणूस सर्वस्वाचा त्याग तर करू शकत नाही. शरीराहून आत्मा भिन्न आहे हे सर्वांनाच कळते पण त्याचा अनुभव मात्र सोपा नाही. भक्ताची अशी समजूत असते गाईत वास करणाऱ्या भगवंताची सेवा गवतात वास करणाऱ्या भगवंतानेच करीन. भक्तीमार्गात सद्भाव आवश्यक असतो. सर्वांप्रती सद्भाव राखणे कठीण कार्य आहे. मनाची मलीनता दूर करण्यासाठी ध्यानाची आवश्यकता आहे. आणि ध्यानासाठी तीव्र वैराग्याची आवश्यकता आहे.

गुरूमाऊली - प.पू.स.अलोकनाथजी महाराज

# जागतिक जम्प रोप स्पर्धेत डोंबिवलीच्या खेळाडूंची चमकदार कामगिरी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : जपानच्या कावासाकी शहरात जागतिक जम्प रोप (दोरी उड्या) चॅम्पियन स्पर्धेत डोंबिवलीच्या तरुण मुलामुलींनी पुन्हा एकदा चमकदार कामगिरी करून दाखविली आहे. 27 जुलै ते 3 ऑगस्ट 2025 या दरम्यान झालेल्या स्पर्धेत महाराष्ट्राच्या टीमने दोन सुवर्ण, आठ रौप्य आणि सहा कांस्य अशी एकूण 16 पदकांची कमाई केली असून त्यात बहुतेक खेळाडू हे डोंबिवलीकर होते.

या जागतिक चॅम्पियन स्पर्धेत 36 देशातील 2600 खेळाडूंनी भाग घेतला होता. विशेष म्हणजे याच खेळाडूंनी जुलै 2023 मध्ये अमेरिकेत झालेल्या जागतिक जम्प रोप चॅम्पियन स्पर्धेत आणि जुलै 2024 जपान मध्ये एशियन स्पर्धेत अशीच पदके मिळवली होती. कोणताही सरकारी निधी, खाजगी प्रायोजक न घेता, स्वताच्या खर्चाने या टीमने ही कौतुकास्पद कामगिरी केली आहे. त्यामुळे पुढे अशीच कामगिरी करण्यासाठी त्यांना आर्थिक मदतीची गरज आहे. लोकप्रतिनिधी, सरकारी निधी व खाजगी प्रायोजक यांच्याकडून काही निधी मिळाल्यास या खेळासाठी अनेक नामवंत खेळाडू देशासाठी तयार होतील अशी अपेक्षा प्रशिक्षक अमन वर्मा यांनी व्यक्त केली आहे.

भूमिका नेमाडे सुवर्ण, एशान पुथ्रन एक सुवर्ण व एक रौप्य, तन्वी नेमाडे दोन रौप्य व एक कांस्य, नमन गंगवाल (नाशिक) दोन रौप्य व एक कांस्य, अमन वर्मा एक रौप्य व एक कांस्य, मानस मुंगी एक रौप्य व एक कांस्य, रोनक साळवे एक रौप्य, पारोल झंकार एक कांस्य, पद्माक्षी मोकाशी एक कांस्य अशी एकूण 16 पदके जिंकली आहेत. वय 16-18 आणि 19 + अशा वर्गवारीत एकेरी, दुहेरी, तिहेरी, मिश्र यामध्ये उपरोक्त पदके या तरुणांनी जिंकली आहेत.

## पनवेल येथे
# आज जनता दरबार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : वैध मापन शास्त्र, यंत्रणेच्या कार्यपध्दतीत पारदर्शकता वाढविणे, लोकसंपर्क दृढ करणे आणि ग्राहकांच्या तक्रारीचे वेळेवर निराकरण करणे या उद्देशाने उपनियंत्रक वैध मापन शास्त्र, रायगड जिल्हा क्रमांक 1 यांच्या वतीने कार्यालय, निरीक्षक वैध मापन शास्त्र, पनवेल नर्मदा कॉम्फ्लेक्स गाळा क्रमांक 34,35, व 36 स्टेशन रोड पनवेल येथे दि.05 ऑगस्ट 2025 रोजी दुपारी 12. 30 वाजता जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती उपनियंत्रक वैध मापन शास्त्र रायगड जि.क्र.1 संजीव कवरे यांनी दिली आहे.

जनता दरबारामध्ये ग्राहक संघटना, व्यापारी उपयोगकर्ते संघटना, उत्पादक/पॅकर यांना वैध मापन शास्त्र, अधिनियम 2009 व त्या अंतर्गत नियमाबाबत मार्गदर्शन करण्यात येणार असून त्यांच्या कांही अडचणी असल्यास त्यांचे निराकरणही करण्यात येईल. जनता दरबारामध्ये प्राप्त होणाऱ्या तक्रारी, सुचनाचे निराकरण करण्यासाठी व तात्काळ कार्यवाही करण्यासाठी विभागामधील अधिकारी प्रत्यक्ष हजर राहणार आहेत.

ग्राहक, वजने मापे उपयोगकर्ते, उत्पादक, आयतदार, औद्योगिक आस्थापना पॅकर तसेच परवानाधारक यांच्या कांही तक्रारी असल्यास कार्यालयाच्या Email ID-aclmrigad@yahoo.in, या ई-मेलवर किंवा प्रत्यक्ष कार्यालयमध्ये पाठवण्यात यावे.

# डोंबिवलीत मतदार नोंदणी आणि मोफत पॅन कार्ड वाटप



### शिवसेना मतदार नोंदणी केंद्र ठिकाणं -

१ ) फुले रोड, रिक्षा स्टॅन्ड,डोंबिवली(पश्चिम)
२) मच्छी मार्केट समोर, गुप्ते रोड , डोंबिवली ( पश्चिम)
३) रेल्वे स्टेशन जवळ, दिनदयाळ रोड, डोंबिवली (पश्चिम)
४) ट्रॅफिक ऑफिस समोर, रेल्वे स्टेशन जवळ, डोंबिवली (पूर्व)
५) शिवसेना मध्यवर्ती शाखे समोर, मानपाडा रोड, डोंबिवली ( पूर्व )

**१८ ते २५ वयोगटातील युवक युवतींसाठी नवीन मतदार नोंदणी करून नवीन पॅन कार्ड बनविण्यासाठी तसेच मतदार याद्दीतील असलेल्या नाव, वय, पत्ता, व इतर गोष्टींमध्ये बदल करण्यासाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे खालील प्रमाणे....**

१) तीन पासपोर्ट साईटचे रंगीत फोटो
२) आधार कार्डच्या दोन झेरॉक्स प्रती
३) चालू महिन्याचे लाईट बिल
गॅस सिलेंडर पावती किंवा रेशन कार्ड यापैकी एक झेरॉक्स प्रत.

दै.ठाणे जीवनदीप वार्ता


डोंबिवली : खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे साहेबांच्या संकल्पनेतून साकारलेल्या कल्याण लोकसभा मतदारसंघातील नवीन मतदार नोंदणी करणाऱ्या १८ ते २५ वयोगटातील युवक युवतींसाठी नवीन मतदार नोंदणी केल्यानंतर मोफत पॅन कार्ड पुरविणाऱ्या योजनेची सुरुवात करण्यात आली आहे. सदर योजनेचा प्रातिनिधिक स्वरूपात उद्घाटन सोहळा आज शनिवार दिनांक २ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी कल्याण ग्रामीण विधानसभेचे कार्य तत्पर आमदार श्री राजेश गोवर्धन मोरे यांच्या शुभहस्ते डोंबिवली शिवसेना शहर शाखेच्या समोरील मतदार नोंदणी मंडपात शिवसेनेच्या अनेक महिला पुरुष - पदाधिकारी, कार्यकर्ते, नगरसेवक आणि नगरसेविका तसेच या योजनेचा लाभ घेण्यासाठी आलेल्या युवक युवतींच्या उपस्थितीत पार पडला.

कल्याण लोकसभा क्षेत्रातील सदरची मतदार नोंदणी करणाऱ्यांसाठीची मोफत पॅन कार्ड पुरवणारी योजना १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत दररोज सकाळी ९:०० ते दुपारी १:०० आणि संध्याकाळी ५:०० ते रात्री ९:०० या वेळेत डोंबिवलीतील पूर्व आणि पश्चिम येथे खालील ठिकाणी सुरू राहणार आहे. सदर मतदार नोंदणीच्या ठिकाणी नवीन मतदार नोंदणी करणाऱ्या १८ ते २५ वयोगटातील युवक युवतींसाठी नवीन नाव नोंदणी करणे, नवीन पॅन कार्ड काढणे तसेच मतदार यादीत नावे असलेल्या मतदारांची यादीतील नाव, वय, जन्मतारीख, पत्ता व इतर गोष्टींमध्ये बदल करण्यासाठी येणाऱ्या नागरिक बंधू भगिनींनी खाली दिलेली कागदपत्रे आपल्या सोबत आणावीत.

आपले नाव मतदार यादीत यावे ह्या साठी नव तरुण तरुणींनी ह्या उपक्रमाचा लाभ घेऊन आपले नाव नोंदणी करून घ्यावे तसेच मतदार यादीत नावे असलेल्या मतदारांनी आवश्यक असणाऱ्या दुरुस्ती या योजनेअंतर्गत करून घ्याव्यात असे आवाहन शिवसेनेकडून करण्यात आले आहे.

नवीन मतदार नोंदणी करणे तसेच मतदार यादी मध्ये असलेल्या नावांमध्ये सुधारणा करणे आणि मतदार नोंदणी करण्यासाठी आलेल्या युवक युवतींसाठी मोफत पॅन कार्ड पुरवण्याच्या योजनेचा शुभारंभ आज आमदार श्री राजेश गोवर्धन मोरे यांच्या शुभहस्ते करण्यात आला त्या शुभप्रसंगी शिवसेनेचे युवा सेना जिल्हा अध्यक्ष श्री जितेन पाटील, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख श्री राजेश कदम, शिवसेना जिल्हा सचिव श्री नरेश पाटील, कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक आणि शिवसेना विभाग प्रमुख श्री मनोहर बामा पाटील, डोंबिवली शहर सचिव संतोष चव्हाण, नगरसेवक आणि उपशहर प्रमुख श्री जनार्दन म्हात्रे, कल्याण ग्रामीण विधानसभा संघटक श्री ओम लोके, सौ स्वातीताई हिरवे डोंबिवली पूर्व महिला आघाडी शहर प्रमुख, डोंबिवली पश्चिम महिला आघाडी प्रमुख केतकीताई पोवार, उपशहर प्रमुख श्री गजानन व्यापारी, उपशहर प्रमुख श्री दिनेश शिवलकर, उपशहर प्रमुख श्री गोरखनाथ उर्फ बाळाशेठ म्हात्रे, उपशहर प्रमुख श्री सुदाम जाधव, उप-तालुकाप्रमुख श्री राहुल गणफुले, युवासेना शहर अध्यक्ष श्री सागर जेधे, विभाग प्रमुख श्री संदेश पाटील, विभाग प्रमुख श्री अमोल पाटील, विभाग प्रमुख श्री शिवराम हळदणकर, विभाग प्रमुख श्री हरीश भोईर, शाखाप्रमुख श्री रोहन मोरे, सह कार्यालय प्रमुख श्री बालन मोरे शिवसैनिक सुनील पवार, ज्येष्ठ शिवसैनिक लक्ष्मण बाबुराव महांगडे, शिवसैनिक राजन नारायण कोरगावकर, शिवसैनिक सुनील मालनकर, उपशहर संघटक श्री संतोष तळाशीलकर, नगरसेवक श्री संजय पावशे, शाखाप्रमुख अंकित जाधव, प्रमिलाताई जाधव महिला आघाडी उपशहर प्रमुख, खासदार कार्यालयाचे श्री प्रकाश शांताराम माने तसेच अनेक महिला पुरुष पदाधिकारी, नगरसेवक, कार्यकर्ते आणि या योजनेचा लाभ घेण्यासाठी आलेले अनेक युवक युवती व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्रीनिवास गडकरी यांच्या बाल कविता संग्रहाचे प्रकाशन




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : रायगड जिल्ह्यातील सुप्रसिद्ध साहित्यिक श्रीनिवास गडकरी यांच्या "स्वप्नात आला बाप्पा " या बाल कविताच्या संग्रह नुकताच प्रसिद्ध झाला आहे. पुण्याच्या बुक मार्क पब्लिकेशन या नामवंत प्रकाशन संस्थेने काढलेला या संग्रहात विविध प्रकारच्या चाळीस हून अधिक कविता संकलित केल्या आहेत. साधारण चौदा वयोगटा पर्यंतची मुले डोळ्या पुढे ठेउन यातील कविताची निवड केली आहे. यात बडबड गिते, गेय गाणी या शिवाय काही प्रबोधन गीतांचाही समावेश आहे. या पुस्तका विषयी बोलताना श्रीनिवास गडकरी म्हणाले कि' माझे २५ वे पुस्तकं आहे. माझ्या इतर पुस्तकां प्रमाणे याही पुस्तकाचे रसिक वाचक चांगले स्वागत करतील असा मला विश्वास आहे. संस्कारक्षम मुले डोळ्या पुढे ठेऊन कविताची निवड केली आहे. जेणे करून इंग्रजी माध्यमात शिकत असलेल्या मुलांनाही कविता वाचताना अडचण येणारं नाही. कमी होतं चाललेल्या वाचन काळात या पुस्तकाने मुले थोडी तरी शब्दाकडे आकर्षित झाली तरी मला आनंद होईल. नवीन काव्य संग्रहा बद्दल श्री गडकरी यांचे डोंबिवली चे प्रसिद्ध कवी विजय जोशी, रत्नागिरीचे आश्रफ मुकरी, कल्याणचे श्रीकांत पेटकर, पनवेलचे रवींद्र सोनावणे यांनी अभिनंदन केले. पुस्तका बद्दल अधिक माहिती पाहिजे असल्यास 9130861304 या नंबर वर संपर्क करावा असे आवाहन करण्यात येत आहे.

## राष्ट्रीय चर्मकार महासंघाची कार्यकारिणी जाहीर

### राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या ठाणे जिल्हा उपाध्यक्ष पदी श्याम जाधव तर तालुका अध्यक्ष पदी विलास जाधव



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष बबनराव घोलप ,प्रदेशाध्यक्ष डॉ शांताराम कारंडे साहेब यांच्यी आदेशाने व मार्गदर्शनाखाली आज दि 03/08/2025 रोजी शासकीय विश्रामगृह सभागृहात चर्मकार महासंघाची मुरबाड तालुका बैठक आयोजीत करण्यात आली होती. सदर बैठकीत मुरबाड शहरातील उद्योजक तथा सामाजिक कार्यकर्ते श्री. श्याम जाधव यांची जिल्हा उपाध्यक्ष पदी तर श्री विलास कमलाकर जाधव यांची मुरबाड तालुका अध्यक्षपदी एकमताने निवड करून नियुक्तीपत्र देण्यात आले.

राष्ट्रीय चर्मकार महासंघ ही एक अराजकीय संघटना असुन समाजाच्या तळागळातील घटकां पर्यत संघटना पोहचुवुन समाजाच्या कल्याणासाठी काम करावे असे मार्गदर्शन व शुभेच्छा यावेळी ठाणे जिल्हे अध्यक्ष राम बनसोडे यांनी दिल्या. तर मुरबाड तालुका रिपाईचे तालुका अध्यक्ष दिनेश उघडे यांनी सुद्धा या निवडि बद्दल दोघांना शुभेच्छा दिल्या. यावेळी कल्याण डोंबिवली जिल्हा अध्यक्ष भैरवनाथ वाघमारे, जिल्हा सरचिटणीस गजेंद्र राऊत, सोमनाथ राऊत , भिकाजी कांबळे, लोकक्रांती सामाजिक संघटनेचे अध्यक्ष नरेश मोरे, रिपाई तालुका उपाध्यक्ष रमेश देसले,रिपाई तालुका यूवक अध्यक्ष धनंजय थोरात, सामाजिक कार्यकर्ते महेश जाधव म.रा.पत्रकार संघटनेचे तालुका अध्यक्ष दिलीप पवार, पत्रकार चेतन पोतदार, सामाजिक कार्यकर्ते सचिन शिंदे, चंद्रकांत चव्हाण, सुराडकर, शिवाजी भिसे तसेच मोठ्या संख्येमध्ये समाज बांधव उपस्थित होते.त्यांच्या या निवडीमुळे सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

## चोरट्यामुळे प्रवाशाला गमावला पाय

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : अल्पवयीन मुलाने मेल एक्सप्रेसच्या दारावर उभा असलेल्या प्रवाशाला फटका मारून मोबाईल हिसकावला. यामुळे प्रवासी खाली पडल्याने त्याच्या दोन्ही पायाला गंभीर दुखापत झाली असून एक पाय गमावल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. आंबिवली आणि शहाड रेल्वे स्थानका दरम्यान हि अतिशय धक्कादायक घटना घडली आहे. चोरटा एवढ्यावरच थांबला नाही, तर जखमी अवस्थेत असलेल्या या प्रवाशाचे 20 हजार देखील लुटले आहेत. जखमीप्रवाशाचे नाव गौरव रामदास निकम असून कल्याण रेल्वे पोलिसांनी गुन्हा दाखल करत अवघ्या काही तासात अल्पवयीन इराणी चोरट्याला अटक केली आहे. अल्पवयीन मुलाविरोधात या आधी देखील चार ते पाच गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांनी सांगितले असून याप्रकरणाचा कल्याण रेल्वे पोलिसांकडून तपास सुरू आहे. अध्यक्ष दिलीप पवार, पत्रकार चेतन पोतदार, सामाजिक कार्यकर्ते सचिन शिंदे, चंद्रकांत चव्हाण, सुराडकर, शिवाजी भिसे तसेच मोठ्या संख्येमध्ये समाज बांधव उपस्थित होते.त्यांच्या या निवडीमुळे सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) — कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) — कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) — कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) — कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) — कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

Printed by AIS Printing Solution Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN, printed at Thane and published at Building No-B-24,Room no-9,gholap Nagar, Murbad Road, Neyr Anpam Nagar Kalyan west editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.